सकाळ

# 'पीएमटी'ची माहिती आता 'ऑनलाइन'

पुणे,ता. ६ - प्रवाशांना 'पीएमटी'बद्दलची इत्थंभूत माहिती देणाऱ्या संकेतस्थळाचे उद्‍घाटन महापालिकेचे आयुक्त डॉ. नितीन करीर यांच्या हस्ते आज झाले. या संकेतस्थळावर 'पीएमटी'च्या सर्व मार्गांबरोबरच शहरात कुठे थांबे आहेत इथपासून, ते नागरिकांनाही आता तक्रार ऑनलाइन करता येणार आहे. ......
गेली वर्षभर रखडलेल्या पीएमटीच्या www.pmtpune.org या संकेतस्थळाचे काम अखेर पूर्ण झाले असून, आज एका छोटेखानी समारंभात ती नागरिकांसाठी खुली करण्यात आली. संगणक क्षेत्रातील पर्सिस्टन्ट सिस्टिम यांच्या सहकार्याने हे संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या वेळी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आनंद देशपांडे, 'पीएमटी'चे महाव्यवस्थापक सी. के. अनिल, अध्यक्ष भीमराव पाटोळे, 'पीटीटीएफ'चे समन्वयक रणजित गाडगीळ, समीर चाबुकस्वार आदी उपस्थित होते.

या संकेतस्थळावर 'पीएमटी'च्या स्थापनेपासून सद्यःस्थितीपर्यंत, बसमार्ग, प्रासंगिक करार, पुणे दर्शन यांच्यासह 'पीएमटी'च्या वतीने मागविण्यात येणाऱ्या निविदा, महत्त्वाच्या घटना इत्यादी सर्व माहिती या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. याशिवाय वेळोवेळी बसच्या मार्गात करण्यात येणारे बदल, नवीन मार्ग यांची माहितीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या संकेतस्थळाविषयीची माहिती समीर चाबुकस्वार यांनी दिले. ते म्हणाले, "यासाठी प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधून त्यांना हे संकेतस्थळ कसे असावे याची माहिती घेतली; तसेच देशात अन्य वाहतूक संस्थांच्याही संकेतस्थळांची माहिती घेऊन तयार करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना 'पीएमटी'विषयी माहिती मिळण्यास मदत होणार आहे."

डॉ. नितीन करीर म्हणाले, "चार वर्षांपूर्वी 'पीएमटी'ची अवस्था अत्यंत वाईट होती; मात्र गेल्या काही वर्षांत अनेक महत्त्वाचे बदल 'पीएमटी'मध्ये झाले. आज 'पीएमटी'तील ताफ्यात बसची संख्या वाढली आहे. गर्दीच्या काळात प्रवाशांना वाहून नेण्याची क्षमताही वाढली आहे. दररोजचे सरासरी उत्पन्न पन्नास लाख रुपयांपर्यंत गेले आहे. याशिवाय आणखी काही बदल करण्यात येत आहेत."

श्री. अनिल म्हणाले, "पुणेकरांना ही माहिती उपयुक्त ठरेल. जे बदल वेळोवेळी होतील त्यांचीही माहिती या संकेतस्थळावरून नागरिकांना दिली जाईल." या वेळी आनंद देशपांडे, भीमराव पाटोळे, रणजित गाडगीळ यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'पीएमटी'चे जनसंपर्क अधिकारी दीपक परदेशी यांनी केले.

'ऑनलाइन' तक्रार करता येणार
या संकेतस्थळावरून 'पीएमटी'विषयी माहितीबरोबरच नागरिकांना ऑनलाइन आपल्या तक्रारीदेखील नोंदविता येणार आहेत. त्या तक्रारींची दखल तीन दिवसांत घेण्यात येणार असल्याचेही या वेळी 'पीएमटी'चे महाव्यवस्थापक सी. के. अनिल यांनी या वेळी सांगितले, तर 'पीएमटी'च्या मार्गांविषयी लवकरच 'एसएमएस'द्वारे माहिती देण्याची योजना असल्याचे या वेळी महापालिका आयुक्त डॉ. नितीन करीर यांनी सांगितले. सध्या पीएमटीचे दोनशे मार्ग आहेत. त्यामध्ये फेरबदल करून ते कमी करता येतील का, या दृष्टीनेही विचार सुरू असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.